**खोटा**

दिशा हिरमुसल्या आज, अंधारल्या वाटा
काजळल्या राती किरण, आशेचा खोटा ॥ १ ॥

आव्हान कहर, भावना बहर सोसाटा
उभारी मनास कधी, उसासाच खोटा ॥ २ ॥

दिवसाच्या प्रकाशा जीव, झालाय पारखा
झाकोळल्या वेळी भास, चंद्रही खोटा ॥ ३ ॥

रोजचीच रात रोजचा, अंधार सखा
त्याच्या माझ्या संवादाचा, शब्दही खोटा ॥ ४ ॥

एकदा अंधाराने पाठविला, आधार लखोटा
भाव जसा तैसाच, दिलासाही खोटा ॥ ५ ॥

एका उभारीने दिली, तेजल शलाका
त्याचा साथही खोटा, तो अंधारही खोटा ॥ ६ ॥

**© सचिन पु. कुलकर्णी**

**www.saarthbodh.com**
**FB ID - sachin.kulkarni78**